| | | | |
|---|---|---|---|
| MHSN110009352022 | दाखल ता. | : | ०५/०९/२०२२ |
| | नोंदणी ता. | : | ०६/०९/२०२२ |
| | निकाल ता. | : | २५/०६/२०२५ |
| | कालावधी : ०२व. ०९म. २०दि. | | |

आटपाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
(पीठासीन अधिकारी अश्वीनी जोतीराम बाचुळकर)

न्यायनिर्णय तारीख : २५/०६/२०२५
संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३८०/२०२२
निशाणी : ११

(आटपाडी पोलीस ठाणे गु.र.नं.२३०/२०२१)

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विटा यांचेमार्फत |
| अभियोग पक्षातर्फे वकील | | सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे |
| आरोपी | | गोरख बापू चव्हाण<br>वय : ५३ वर्षे, धंदा : मजुरी<br>रा. रामोशी गल्ली, जांभुळणी,<br>ता. आटपाडी, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री.एस.व्ही.पाठक |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ३१/१२/२०२१ |

| | |
|---|---|
| एफ.आय.आर. तारीख | ३१/१२/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०५/०९/२०२२ |
| आरोपाचा आशय वाचून दाखविल्याची तारीख | १७/०८/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २९/०३/२०२५ |
| निकाल राखून ठेवलेली तारीख | २५/०६/२०२५ |
| निकालाची तारीख | २५/०६/२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडलेली तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गोरख बापू चव्हाण | -- | -- | मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(ई) | निर्दोष | -- | -- |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचा तपशील |
|---|---|---|
| १. | शशिकांत ज्ञानू सुर्वे (नि.९) | पंच |

## निशाणी पडलेले कागद

अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १० | पंचनाम्यावरील सही |

## न्यायनिर्णय
## (घोषित तारीख : २५/०६/२०२५)

**अभियोग पक्षाची बाजू थोडक्यात खालीलप्रमाणे –**

दिनांक ३१/१२/२०२१ रोजी वर्दीदार हे कार्यालयात हजर असताना एका खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, रामोशी गल्ली, जांभुळणी येथे एक इसम बेकायदा विना परवाना देशी दारुची चोरुन विक्री करत आहे. त्याप्रमाणे पंचनाम्यातील नमूद पंचांना बातमीचा आशय सांगून वर्दीदार व त्यांचे सहकारी छाप्यासाठी आवश्यक असणारे साहित्य घेवून खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले. तेथे बातमीच्या ठिकाणापासून काही अंतरावर खाजगी वाहन एका आडोशाला थांबवून बातमीच्या ठिकाणी टेहाळणी करत असताना १३.५५ वाजता एक संशयित इसम त्याचे कब्जातील कापडी पिशवीसह एका झुडपाच्या आडोशाला दिसून आला.

त्यांना पाहून तो इसम पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्या सर्वांनी घेराव घालून त्यास पकडले. त्याच्या ताब्यातील कापडी पिशवीची पंचांकरवी तपासणी केली असता त्यामध्ये काही देशी दारुच्या सीलबंद बाटल्या असल्याचे दिसून आले. आरोपीस दारु वाहतूक, विक्री किंवा जवळ बाळगण्याचा सरकारी परवाना आहे का असे विचारले असता त्याने नाही म्हणून सांगितले. त्याच्या ताब्यातून दारुच्या बाटल्या व एक कापडी पिशवी मिळून आली. त्यामुळे, वर्दीदार याने आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

२. वर्दीदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आटपाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२३०/२०२१ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी के.पी.शेलार यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी गुन्ह्याच्या तपासकामी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा आल्याने दोषारोपपत्राच्या स्वरुपात अंतिम अहवाल पाठविण्यात आला.

३. आरोपीना आरोपाचा आशय निशाणी ८ येथे वाचून दाखविला असता आरोपीने गुन्हा नाकबूल असल्याचे सांगितले. त्यामुळे खटल्याची संपरीक्षा घेण्यात आली. अभियोग पक्षामार्फत सादर करण्यात आलेला पुरावा पाहता आरोपीचे विरुध्द त्यांनी गुन्हा केला आहे असे तथ्य प्रस्थापित न झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसार जबाब नोंदवण्यात आला नाही.

४. उभय पक्षकारांच्या वकीलांचा युक्तिवाद मी ऐकलेला आहे. एकंदरीत आरोपीवर निश्चित करण्यात आलेला आरोप, त्यास अनुसरुन अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा आणि मांडण्यात आलेला युक्तिवाद याचा विचार करुन माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ३१/१२/२०२१ रोजी १३.५५ वाजताच्या सुमारास रामोशी गल्ली जांभुळणी येथे आरोपी स्वतःच्या फायद्याकरीता बेकायदेशीरपणे विनापरवाना १८० मिलीच्या देशी दारु संत्रा विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला, असे अभियोग पक्ष शाबीत करतो काय? | नकारार्थी... |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते... |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत –**

५. याकामी सरकारी वकील आणि आरोपी यांच्यामार्फत विधिज्ञांचा सखोल युक्तिवाद ऐकला.

६. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने याकामी शशिकांत ज्ञानू सुर्वे (सा.क्र.१) यांना पंचनाम्यावरील साक्षीदार म्हणून तपासण्यात आले आहे. परंतु त्याच्या पुराव्यात असे आले आहे की, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांना कोठे बोलावले होते हे त्यांना आठवत नाही. त्यांच्यासमक्ष पंचनामा केला व मुद्देमाल जप्त केला असे काही घडले नाही. त्यांनी केवळ पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली आहे. त्यामुळे,

सरकारी वकील यांच्यामार्फत उपरोक्त साक्षीदाराला उलटतपासा दरम्यान विचारता येतील असे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. मात्र, सदर साक्षीदाराकडून उलटतपासादरम्यान सुचविणेत आलेले प्रत्येक तथ्य नाकारण्यात आले. त्यामुळे अभियोग पक्षाला उपयुक्त होईल असे कोणतेही तथ्य सदर साक्षीदाराच्या पुराव्यातून प्रस्थापित झालेले नाही.

७. पंच साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच अभियोग पक्षामार्फत तपासिक अधिकारी यांची साक्ष नोंदवून सदरचा जप्ती पंचनामा सिध्द करण्यात आलेला नाही. त्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून देशी दारु संत्रा १८० मिली क्षमतेच्या २० सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या ही बाब अभियोग पक्षामार्फत सिध्द करण्यात आलेली नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी यांना वेळोवेळी साक्षीसमन्स काढूनही ते साक्षीसाठी उपलब्ध झाले नसल्यामुळे अभियोग पक्षाचा तोंडी पुरावा बंद केल्याबाबतचा आदेश पारीत करण्यात आला. तसेच प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद देखील अभियोग पक्षामार्फत शाबीत करण्यात आलेली नाही. त्यामुळे जरी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र याकामी दाखल असले तरी देखील सदरचा मुद्देमाल हा आरोपीच्या ताबेतून जप्त करण्यात आला आहे हे तथ्य शाबीत झालेले नाही. त्यामुळे सदर गुन्हा आरोपीने केलेला आहे असे निर्विवादपणे शाबीत होत नाही. याकामी इतर साक्षीदारांचा पुरावा नोंदविला असता तर वेळेचा अपव्यय ठरला असता व त्यातून आरोपीने गुन्हा केला आहे असे कोणतेही तथ्य प्रस्थापित झाले नसते. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

८. या कामातील जप्त मुद्देमाल हा आरोपीने अगर अन्य इसमांनी मागितलेला नसल्याने त्याची महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे

कलम ९८ अन्वये पुढील विल्हेवाट लावणे न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर देण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) या गुन्ह्यामधून निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अपील कालावधी संपल्यानंतर जप्त दारुचा मुद्देमाल हा महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ९८ अन्वये पुढील विल्हेवाटीसाठी सरकार जमा करण्यात यावा. तसेच कापडी पिशवी ही मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करावी.

४. आरोपी याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ ची पुर्तता ७ दिवसांच्या आत करायची आहे.

५. सदर न्यायनिर्णयाची प्रत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४०६ नुसार मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना पाठविण्यात यावी.

(भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३९२(१) अन्वये घोषित करणेत आला.)

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.06.26 11:34:35 +0530

आटपाडी.
दिनांक : २५/०६/२०२५

(अ. जो. बाचुळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi. |
| Date | : | 25/06/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 25/06/2025 |
| Order uploaded on | : | 26/06/2025 |